# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र – ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. 63/2018
दिनांक:- 08/10/2018

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | :- | श्री. गोविंद धोंडी परब |
| २ | पत्ता | :- | ३०३/ए, जय साईविहार को. ऑप. हौ. सोसायटी, कस्तुरी गार्डन कॉम्प्लेक्स, भाईंदर (प), ठाणे. |
| ३ | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील | :- | |
| (एक) | माहितीचा विषय | :- | मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावाबाबत. |
| (दोन) | माहितीशी संबंधित कालावधी | :- | दि. ०१/०२/१९९९ ते दि. ३०/०४/१९९९ |
| (तीन) | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | :- | |

१. मा. सर्वसाधारण सभा दि. ०३/०४/१९९९ करीता तत्कालीन मा. मुख्याधिकारी यांनी (प्रशासनाने ) श्री. संजय द. शुक्ल (लिपीक) व श्री. मुरलीधर घोडे (लिपीक) यांना बडतर्फ करणे प्रकरणी दिलेल्या गोषवाऱ्याची नक्कल प्रत.

२. मा. सर्वसाधारण सभा दि. ०३/०४/१९९९ ठराव क्र. २०७ ची नक्कल प्रत.

३. मा. सर्वसाधारण सभा दि. ०३/०४/१९९९ च्या इतिवृत्तांताची नक्कल प्रत.

| | | | |
|---|---|---|---|
| (चार) | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल) | :- | **व्यक्तीशः** कृपया माहिती तयार झालेवर खालील भ्रमणध्वनीवर संपर्क करावा म्हणजे कागदपत्राच्या सांक्षाकित प्रतीसाठी येणारे शुल्क भरून माहिती घेऊन जाईन |
| (पाच) | टपालाद्वारे असेल, त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र ) | :- | --- |
| (सहा) | ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | :- | मा. न्यायालयीन कामकाजासाठी |

ठिकाण :- भाईंदर (प)

दिनांक :- ०५/१०/२०१८

(गोविंद परब)
मो. नं. : ९००४४०२४०२

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./63/2018 दिनांक :-24/10 /2018

प्रति,
**श्री. गोविंद धोंडी परब,**
**303/ए, जय साईविहार को.ऑ.हौ.सो.**
**कस्तुरी गार्डन कॉम्पलेक्स, भाईंदर (प.)**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005.</u>**
**मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावाबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 05/10/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मा. सर्वसाधारण सभा दि. 03/04/1999 तत्कालीन मा. मुख्याधिकारी यांनी श्री. संजय द. शुक्ल (लिपीक) व श्री. मुरलीधर घोडे (लिपीक) यांना बडतर्फ करणेप्रकरणी दिलेल्या गोषवाऱ्याची नक्कल प्रत, मा. सर्वसाधारण सभा दि. 03/04/1999 ठराव क्र. 207 ची नक्कल प्रत व इतिवृत्तांताच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने नगरसचिव विभागात उपलब्ध अभिलेख्यानुसार आपणांस दि. 03/04/1999 रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांताची व ठराव क्र. 207 ची साक्षांकित प्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत. श्री. संजय द. शुक्ल (लिपीक) व श्री. मुरलीधर घोडे (लिपीक) यांना बडतर्फ करणे संबंधीत विषयाचा गोषवारा दि. 03/04/1999 रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध नसल्याचे दिसुन येत आहे. करिता आपणांस गोषवारा प्रत उपलब्ध करून देता येत नाही.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

24/10/18

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

(मुकुंद पांडे)

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Govind Parab.docx

विषय क्र. ४ :- नगरपालिका लिपिक कर्मचारी श्री. संजय शुक्ला व श्री. मुरलीधर घोडे यांना सेवेतून बडतर्फ करणेच्या मा. स्थायी समिती ठराव क्र. १६२ दि. २३. ११. ९८ चे शिफारशीवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

---

| | |
|---|---|
| श्री. आसिफ शेख, सदस्य | स्थायी समितीचा काय निर्णय आहे ? |
| प्रशासकीय अधिकारी - | स्थायी समिती ठराव क्र. १६२, दि. २३. ११. ९८ वाचुन दाखविला. |
| श्री. सुरेश पाटील, सदस्य- | अपहार केलेले पैसे नगरपालिकेकडे भरले का ? |
| प्रशासकीय अधिकारी - | रक्कमेचा भरणा केला आहे. |
| श्री. चंद्रकांत म्हात्रे, सदस्य- | लिपिक एवढा घोटाळा करीत होता त्यावेळी अधिकारी काय करीत होते. |
| मुख्याधिकारी - | मालमत्ता कराची वसुल केलेली रक्कम त्यांनी नगरपालिकेकडे भरलेली नाही, लिपिक वर्गाकडून वसुल होणारी रक्कम अधिकारी वर्गाने तपासून पाहिली पाहिजे. |
| श्री. प्रकाश दुबोले, सदस्य- | स्थायी समितीला चौकशी अधिका-याने जो अहवाल दिला आहे. त्यामध्ये मुद्दा क्र. ३ वाचून दाखवावा. |
| मुख्याधिकारी - | हयांनी चौकशी अधिका-याचा अहवाल व प्रस्तावित केलेल्या शिक्षा हयांची माहिती सभागृहास दिली. |
| श्री. प्रकाश दुबोले, सदस्य- | कर वसुली विभागात कर वसुली लिपिक, निरिक्षक अधिक्षक अशी यंत्रणा आहे. कराच्या किती पावत्या फाडल्या किती रक्कमेचा अपहार केला, हयाचे लक्ष न ठेवल्यामुळे कर विभागाकडून निष्काळजीपणा झाला आहे. |
| श्रीम. रिटा शहा, सदस्या- | कर विभागात निरिक्षक म्हणून कोण कोण काम करीत होते हयाची माहिती दया. |
| मुख्याधिकारी - | कर विभागाकडून निष्काळजीपणा झाला असल्याने चौकशी करण्यांत येईल. चौकशी अधिका-याचा अहवाल, प्रस्तावित केलेली शिक्षा व स्थायी समितीने घेतलेला निर्णय सभागृहापुढे ठेवला आहे. हयावर सभागृहांत निर्णय घ्यावयाचा आहे. |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

सर्वसाधारण सभा दि. २.४.९९

**विषय क्र. ४ :-** नगरपरिषद लिपिक कर्मचारी श्री. संजय शुक्ल व श्री. मुरलीधर घोडे यांना सेवेतुन बडतर्फ करणेच्या मा. स्थायी समिती ठराव क्र. १६२ दि. २३.१२.९८ च्या शिफारशीवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. २०८

नगरपालिका कर्मचारी श्री. संजय शुक्ल याने दि. १५.७.९७ ते दि. ९.२.९८ पर्यंत १६७ पावत्या फाडुन रुपये ९९,५१७/- मालमत्ता कराची वसुली करुन दि. ९.२.९८ पर्यंत पैसे भरणा न करता स्वतः:कडे ठेवली होती. तसेच श्री. मुरलीधर घोडे यांनी दिनांक ५.१०.९७ ते दि. ९.२.९८ पर्यंत रक्कम रुपये ६५,६६५/- मालमत्ता कराची वसुली करुन पैसे भरणा न करता स्वतः:जवळ ठेवुन अपहार केला आहे. या दोन्ही कर्मचा-यांनी नगरपालिकेने दि. ९.२.९८ रोजी जा.क्र. अनुक्रमे न्या/सिओ/वशी/२२०९/२२०८ ने निलंबीत केले आहे. वरील निलंबीत कर्मचा-यांची नगरपालिकेने खातेनिहाय चौकशी करीता श्री. हरेश लक्ष्मण पाटील [मुख्यलिपिक] यांची नियुक्ती केली होती. वरिल निलंबीत कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी दि. २.९.९८ रोजी पुर्ण केली आहे. त्याचा अहवाल त्यांनी नगरपालिकेमध्ये सादर केला आहे. चौकशी अहवालामध्ये निलंबीत कर्मचारी यांच्यावर रक्कम रुपये १] ९९,५१७/- २] ६५,६६५/- या तात्पुरता अपहार केल्याचे तात्पुरता त्यांनी दिसुन येते असे चौकशी अहवालात स्पष्ट केले आहे. चौकशी अहवालामध्ये चौकशी अधिका-यांनी दोन्ही लिपिक यांचे विरुध्द असलेल्या आरोपांची सविस्तर पूर्ण चौकशी केली असता निश्चित स्वरूपाचे ठोस पुरावे उपलब्ध झाले आहेत. व लिपिकांनी केलेले वर्तन हे गंभीर स्वरूपाचे व नियमबाह्य आहे. त्याकरीता खालील प्रमाणे शास्ती करण्याचे नियमात तरतुद आहे.

१] सेवेतुन बडतर्फ करणे

२] निलंबन कालावधीतील पगार इतर सर्व भत्ते अदा करण्यात येऊ नये

३] निलंबीत कर्मचा-यांची अगामी दोन वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यात यावे.

दि. २३.११.९८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. १६२ नुसार वरील दोन्ही कर्मचा-यांना नगरपालिका सेवेतुन बडतर्फ करणे बाबत शिफारस केलेली आहे कर विभागाकडुन निलंबनाचा झालेला अहवाल व चौकशी अधिका-यांचा अहवाल प्राप्त होऊन अहवालात प्रस्तावित केलेली शिक्षा व स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी नियम १९६५ चे कलम ७९ नुसार दोन्ही कर्मचारी श्री. संजय शुक्ल व श्री. मुरलीधर घोडे यांना नगरपरिषद सेवेतुन बडतर्फ करणे बाबत सर्व साधारण सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. दिलीप जाधव

अनु :- श्री. चंद्रकांत म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
२५/१०/१८
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका